दिनांक :    .1.2020

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**नवी देहली.**

**विषय : बांगलादेशी घुसखोरांच्या वाढत्या समस्येवर उपाययोजना म्हणून गोव्यात एन्.आर्.सी. लागू करणे आणि बांगलादेशी घुसखोरांना देशाबाहेर काढणे, यांविषयी....**

महोदय,

भारतात बांगलादेशी घुसखोरांची समस्या ही दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. दुर्दैवाने भारतात अनेक शहरात बांगलादेशी घुसखोर असलेल्या मजूरवर्गासाठी सुरक्षित वस्त्या आहेत. तब्बल ५ कोटींहून अधिक बांगलादेशी घुसखोर मुसलमान भारतात रहातात. याचा अर्थ भारताची ४ टक्के लोकसंख्या बांगलादेशी घुसखोर आहे. भारतीय जनतेच्या मूलभूत सुविधांवर या घुसखोरांमुळे अधिक ताण येत आहे. याहून गंभीर म्हणजे यांच्यापैकी अनेक जण आतंकवादी, तसेच राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये गुंतले असल्याचे वेळोवेळी उघड झाले आहे. या घुसखोरांना भारतात शोधून काढणे तसे अवघड आहे; मात्र 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी'च्या माध्यमातून सरकारला आसाममध्ये किमान १९ लाख घुसखोर रहात आहेत, हे तरी स्पष्ट झाले आहे. याचसमवेत राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेचे (एन्.आय.ए.चे) महासंचालक वाय.सी. मोदी यांनी माहिती दिली की, 'जमात-उल-मुजाहिदीन बांगलादेश' (जे.एम्.बी.) ही बांगलादेशी आतंकवादी संघटना बांगलादेशी घुसखोरांच्या माध्यमातून देशात जलदगतीने पसरत आहे. आसाम, झारखंड, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळ येथे ही संघटना सक्रीय आहे. तिच्या १२५ संशयित आतंकवाद्यांची सूची संबंधित राज्यांना सोपवण्यात आली आहे.

घुसखोरांचे वरील भयावह वास्तव पाहता सध्या गोव्यात बांगलादेशी घुसखोर येऊन स्थायिक होऊ लागले आहेत, हे गेल्या अनेक घटनांवरून स्पष्ट होत आहे. या समस्येकडे सरकारने गंभीरतेने पाहणे आता काळाची आवश्यकता बनली आहे.

**तरी या अनुषंगाने आम्ही काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत ....**

१. राय येथे एका अपघातात एका व्यक्तीचे निधन झाले. ही व्यक्ती मूळची बांगलादेशी असल्याची वृत्ते प्रसिद्ध झाली होती.

२. नुकतीच राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने फोंडा येथे एका हॉटेलमध्ये धाड घालून वेश्या व्यवसाय करणाऱ्या तरुणींना कह्यात घेतले होते. या तरुणीदेखील बांगलादेशाच्या नागरिक असल्याची माहिती पुढे आली होती. असे असूनही त्याविषयी कमालीची गुप्तता बाळगली जात असल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

वेश्या व्यवसायात गुंतलेल्या युवतींची सुटका झाल्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्याचे कार्य 'अन्याय रहित जिंदगी' ही गोव्यातील अशासकीय संघटना करते. 'अन्याय रहित जिंदगी' या संघटनेनेही नुकतीच गोव्यात वेश्या व्यवसायात बांगलादेशी युवतींचा सहभाग असल्याचा खुलासा केला आहे.

३. गोव्यातील भंगार गोळा करणे, केशकर्तनालय, भाजी विक्री, मासे विक्री आणि अन्य व्यवसायात बांगलादेशी

नागरिकांचा सहभाग आहे. या व्यक्ती लहानशा झोपड्या बांधून येथेच मुक्काम ठोकत आहेत.

४. पश्चिम बंगालच्या पुरुलिया भागातून बांगलादेशी भारतात घुसखोरी करतात. हे बांगलादेशी घुसखोरी करून त्रिपुरा आणि बिहार या राज्यांत मुक्काम ठोकायचे; मात्र त्यांना तेथे आता काम-धंदा मिळत नसल्याने त्यांनी सुरक्षित ठिकाण म्हणून गोव्याकडे लक्ष वळवले आहे.

५. गोव्यात घुसखोरी करणाऱ्या बांगलादेशींची संख्या सध्या अल्प असली, तरी त्यांच्या विरोधात आताच ठोस कारवाई न केल्यास पुढे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता आहे.

*** तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत ....**

१. गोव्यात निरनिराळ्या व्यवसायात गुंतलेल्या बांगलादेशी घुसखोरांना कोणाचा पाठिंबा आहे, हे शोधून काढून संबंधितांवर कारवाई करावी.

२. घुसखोरांची सूची, छायाचित्रे संबंधित भागांमध्ये प्रसारित करावीत, नोकरी देतांना संबंधितांची पार्श्वभूमी नीट तपासणी करावी, तसेच अशा शंका असलेल्यांना कुठेही नोकरी, भाड्याने अथवा विकत घर मिळू नये अशी व्यवस्था करावी, तसेच घुसखोरांना आश्रय देणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात यावी.

३. भारताच्या सीमा अवैधपणे ओलांडून भारतात येण्यास कोणी धजावणार नाही, अशी या घुसखोरांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

४. वेश्या व्यवसायात बांगलादेशी नागरिक असल्याची माहिती मिळूनही पोलिसांनी त्यांच्या विरोधात कारवाई केल्याचे दिसत नाही. अशा कर्तव्यचुकार पोलिसांवरही कारवाई करावी.

५. गोव्यात ‘राष्ट्रीय नागरिकता नोंदणी’ (एन्.आर्.सी.) लागू करून बांगलादेशी घुसखोरांना गोव्यातूनच नव्हे, तर देशातून बाहेर हाकलून लावावे.

आपला विश्वासू,

स
.
प
क
,